**महसुल विभागाचे मुख्यालय असलेल्या नाशिक, पुणे, नागपूर, अमरावती, औरंगाबाद, नांदेड तसेच औद्योगिक संघटनांनी मागणी केलेल्या सातारा, कोल्हापूर, अहमदनगर, जळगांव, मुंबई (मुंबई प्राधिकरण विभाग) या जिल्ह्यांमध्ये उद्योग सेतू कार्यान्वित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
उद्योग, उर्जा व कामगार विभाग
**शासन निर्णय क्र. उसेतू २००९/प्र.क्र. २१९ /उद्योग-८**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक २९ ऑगस्ट २००९**

**वाचा:** १. विकास आयुक्त (उद्योग) यांचे पत्र दि. ३० जुलै २००४ व त्यासोबतचा उद्योग सेतू बाबतचा प्रस्ताव
२. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्र.सीओएम१००२/प्र.क्र.२४०/०२/३९, दि. २३ ऑगस्ट २००२
३. शासन निर्णय,उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्र.उसेतू २००४/प्र.क्र.७३४/उद्योग-२, दि. ३१ जुलै २००४

**प्रस्तावना:**

माहिती तंत्रज्ञानाच्या सहाय्याने उद्योजकांशी थेट संपर्क साधून जलद व सुलभ रीतीने उद्योगाशी निगडीत विविध सेवा एक खिडकी माध्यमातून एकाच छत्राखाली (सिंगल विंडो) उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीकोनांतून जिल्हा उद्योग केंद्र, ठाणे येथे संदर्भ क्र. ३ अन्वये प्रायोगिक तत्वावर उद्योग सेतू स्थापन करण्यात आला असून सदर सेतू जिल्हा उद्योग केंद्र, ठाणे येथे स्थानिक औद्योगिक संघटना व उद्योग मित्र यांच्या सहकार्याने दिनांक १५.०८.२००४ पासून कार्यान्वित झाला आहे. याच धर्तीवर महसूल विभागाचे मुख्यालय असलेल्या नाशिक, पुणे, नागपूर, अमरावती, औरंगाबाद, नांदेड तसेच या व्यतिरीक्त औद्योगिक संघटनांनी मागणी केलेल्या सातारा, कोल्हापूर, अहमदनगर, जळगांव, मुंबई (मुंबई प्राधिकरण विभाग) या जिल्ह्यांमध्येही उद्योग सेतू कक्ष सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. या प्रस्तावाची रुप-रेषा, अंमलबजावणी, इत्यादींबाबत उद्योग संचालनालयाच्या स्तरावर झालेल्या विविध बैठकांध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. या चर्चेमध्ये सदर महसूल विभागाचे मुख्यालय असलेल्या व औद्योगिक संघटनांनी मागणी केलेल्या जिल्ह्यांतील औद्योगिक संघटनांना सहभागी करण्यात आले होते. उद्योजकांना अत्यावश्यक असलेली ही सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने घेतलेल्या पुढाकारामध्ये आपला सहभाग म्हणून उद्योग सेतू कार्यान्वित करण्यासाठी लागणाऱ्या एकूण खर्चापैकी किमान ५० टक्के आर्थिक भार या जिल्ह्यातील स्थानिक औद्योगिक संघटनांनी उचलण्याची तयारी दर्शविली आहे.

सर्व संबंधित शासकीय विभाग व यंत्रणा तसेच औद्योगिक संघटनांसह झालेल्या प्रदीर्घ चर्चेअंती घेण्यात आलेल्या निर्णयाच्या आधारे खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे:-

**शासन निर्णय :**

१. **राज्यस्तरीय उद्योग मित्र व स्थानिक औद्योगिक संघटनांच्या सहभागातून उद्योग सेतूची स्थापना :-**

उद्योजकांना उद्योगाशी निगडीत विविध शासकीय कायदे, नियम व योजनांची माहिती उपलब्ध करुन देणे, सेवेचा दर्जा वाढविणे, उद्योग उभारणीसाठी विविध शासकीय व निमशासकीय संस्थांकडून लागणारे विविध परवाने/निपटारा प्रमाणपत्रे/ना-हरकत प्रमाणपत्रे/विविध सेवा इत्यादी बाबत मार्गदर्शन करणे आणि एकाच ठिकाणी या सेवा उपलब्ध करुन देणे या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्र ठाणे येथे उद्योग सेतू स्थापनेचा निर्णय

शासनाने संदर्भ क्र.३ नुसार घेतला आहे. आता महसूल विभागाचे मुख्यालय असलेल्या नाशिक, पुणे, नागपूर, अमरावती, औरंगाबाद, नांदेड तसेच औद्योगिक संघटनांनी मागणी केलेल्या सातारा, कोल्हापूर, अहमदनगर, जळगांव, आणि मुंबई (मुंबई प्राधिकरण विभाग) या जिल्ह्यांतील स्थानिक औद्योगिक संघटनांनी एकूण खर्चापैकी किमान ५० टक्के आर्थिक भार उचलण्याची तयारी दर्शविली असल्याने या जिल्ह्यांमधे उद्योग सेतू कार्यान्वित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. बाकी ५० टक्के खर्च उद्योग सेतूवर देण्यात येणाऱ्या सेवांमधून प्राप्त होणाऱ्या सेवा शुल्कातुन तसेच उद्योग मित्र माध्यमातुन स्थानिक गरजेनुसार उद्योग सेतू कक्ष उभारणीचा खर्च भागविण्यात यावा.

२. **उद्योग सेतूची कार्यपध्दती :-**

उद्योग सेतूची कार्यपध्दती व सर्वसाधारण व्यवस्थापनाचे संनियंत्रण आणि यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी उद्योग सेतू कार्यान्वित होणाऱ्या जिल्ह्यात खालील जिल्हास्तरीय समिती काम पाहील. जिल्हास्तरीय समिती जिल्हा सेतू सोसायटीची उप समिती म्हणून काम पाहील.

**जिल्हास्तरीय समिती :-**

| | |
|---|---|
| १. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, | अध्यक्ष |
| २. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ | सदस्य |
| ३. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे प्रतिनीधी | सदस्य |
| ४. संचालक, बाष्पके संचालनालयाचे प्रतिनीधी | सदस्य |
| ५. आयुक्त, कामगार आयुक्तालयाचे प्रतिनीधी | सदस्य |
| ६. संचालक, आरोग्य व औद्योगिक सुरक्षा संचालनालयाचे प्रतिनीधी | सदस्य |
| ७. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादितचे प्रतिनीधी | सदस्य |
| ८. आर्थिक भार उचलणाऱ्या औद्योगिक संघटनेचा प्रतिनिधी | सदस्य |
| ९. जिल्ह्यातील इतर औद्योगिक संघटनांचे दोन प्रतिनिधी | सदस्य |
| १०. जिल्हा स्तरीय सेतू सोसायटीचा प्रतिनिधी | सदस्य |
| ११. उद्योग उप संचालक / व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र | सदस्य-सचिव |

**जिल्हा स्तरीय समितीची कार्यकक्षा**

उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या संदर्भीय शासन निर्णय क्र. उसेतू २००४/प्र.क्र.७३४/उद्योग-२, दिनांक ३१ जुलै २००४ मधील आता कार्यान्वित होणाऱ्या उद्योग सेतूंना जशी आहे तशीच लागू राहील.

३. **प्रकल्पाची व्याप्ती :-**

जिल्हा उद्योग केंद्र, आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या आस्थापनांमार्फत उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या संदर्भीय शासन निर्णय क्र. उसेतू २००४/प्र.क्र.७३४/उद्योग-२, दिनांक ३१ जुलै २००४ मधील बाब क्रमांक ६ मध्ये नमूद केलेल्या सेवा या आता कार्यान्वित होणाऱ्या उद्योग सेतूंवर जिल्ह्यातील उद्योजकांना उपलब्ध करुन देण्यात येतील.

४. **उद्योग सेतू केंद्राची रचना व कार्यप्रणाली :-**

जिल्हा उद्योग केंद्र, ठाणे येथील उद्योग सेतूच्या धर्तीवर आता जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयामधील सल्लामसलत कक्षामध्ये उद्योग सेतू कार्यान्वित करण्यात येईल. उद्योग संचालनालयाने सादर केलेल्या प्रस्तावात नमूद केल्यानुसार सदर केंद्रासाठी लागणारे फर्निचर, हार्डवेअर, सॉफ्टवेअर व इतर अनुषंगिक सुविधा / साहित्य तसेच उद्योजकांच्या सोईसाठी वातानुकूलित यंत्रणा इत्यादी वरील होणाऱ्या खर्चाचा किमान ५० टक्के आर्थिक भार जिल्ह्यांतील स्थानिक औद्योगिक संघटना उचलतील. बाकी ५० टक्के खर्च उद्योग सेतूवर देण्यात येणा-या सेवांमधून प्राप्त होणा-या सेवा शुल्कातून तसेच उद्योग मित्र माध्यमातुन स्थानिक गरजेनुसार उद्योग सेतू कक्ष उभारणीचा खर्च भागविण्यात यावा. उद्योग सेतूमध्ये काऊंटर्स, संगणक यंत्रणा, पर्यवेक्षकांसाठी व अभ्यागतांसाठी बसण्याची व्यवस्था, अभ्यागतांसाठी लिहिण्याचे काऊंटर्स, इत्यादि सुविधा उपलब्ध करण्यात याव्यात.

५. **उद्योग सेतू केंद्राचे व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्ती:-**

जिल्हा उद्योग केंद्र, ठाणे येथील उद्योग सेतूच्या धर्तीवर आता कार्यान्वित होणाऱ्या उद्योग सेतूच्या व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांच्यावर राहील. या सेतूच्या कामकाजासाठी कार्यालयातील उपलब्ध कर्मचाऱ्यांच्या सेवा घ्यावयाच्या आहेत.

६. **उद्योग सेतू मार्फत पुरवावयाच्या सेवा:-**

संदर्भ क्र.३ मधील शासन निर्णयातील मुद्दा क्र. ६ मध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सेवांनंतर खालील विभागांच्या सेवांचा समावेश करण्यात येत आहे.

**अ) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाशी सबंधीत परवानगी:-**

१. उद्योग स्थापन करण्यासाठी प्रमाणपत्र (Consent to Establish)
२. उत्पादन सुरु करण्यासाठी प्रमाणपत्र (Consent to Operate)
३. उपरोक्त प्रमाणपत्रांचे नुतनीकरण करणे.

**ब) कामगार विभागाच्या सेवा:-**

**१) संचालक, बाष्पके संचालनालय**

१. बाष्पके तपासणी व प्रमाणपत्र देणे ( ५ भाग )
२. प्रमाणपत्रांची दुसरी पत्र देणे
३. बाष्पके मालकी हक्कात बदल
४. बाष्पके दुरुस्ती तसेच त्यातील नळ्यांचे बदली करून
५. बाष्पके वापरात आणण्यास परवानगी देणे

**२) आयुक्त, कामगार आयुक्तालय**

१. दुकाने व आस्थापना अधिनियमाखालील नोंदणी
२. दुकाने व आस्थापना अधिनियमाखालील नोंदणीचे नुतनीकरण
३. दुकाने व आस्थापना अधिनियमाखालील नोंदणीमधे बदल
४. दुकाने व आस्थापना अधिनियमाखालील नोंदणी पत्राची दुसरी प्रत

**३) आयुक्त, आरोग्य व औद्योगिक सुरक्षा संचालनालय**

१. इमारत नकाशास मान्यता ( रसायन )
२. इमारत नकाशास मान्यता ( इतर )
३. कारखाना अधिनियमाखालील परवाना
४. कारखाना अधिनियमाखालील परवान्याचे नुतनीकरण

**क) महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित**

१. नवीन वीज जोडणी
२. वीज जोडणी धारण करणा-याच्या नावामध्ये बदल
३. विजेच्या जादाच्या मागणीमध्ये बदल.

दि. ३१.७.२००४ च्या शासन निर्णयातील इतर बाबी या शासन निर्णयाव्दारे कार्यान्वित होणाऱ्या उद्योग सेतूंना जशा आहेत तशा लागू राहतील.

हे आदेश महाराष्ट्राचे औद्योगिक, गुंतवणुक व पायाभुत सुविधा धोरण, २००६ मुद्दा क्रमांक २० नुसार तसेच , ऊर्जा, कामगार, पर्यावरण आणि, सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २००९०८२९१७१४५६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दा. अं. कुलकर्णी)
शासनाचे अवर सचिव

*प्रति,*
मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. उपमुख्यमंत्री यांचे उप सचिव
मा. मंत्री(उद्योग) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री(उद्योग) यांचे खाजगी सचिव
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा / महाराष्ट्र विधान परिषद
मा. मुख्य सचिव
सर्व अतिरिक्त मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
सचिव (ऊर्जा), उ.ऊ. व का.वि.,मंत्रालय,मुंबई-३२
सचिव(पर्यावरण),मंत्रालय, मुंबई-३२
विकास आयुक्त (उद्योग), मुंबई (पाच प्रती)
मुख्य कार्यकारी अधिकारी, म.औ.वि. महामंडळ, मुंबई (तीन प्रती)
सदस्य-सचिव,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई ( दहा प्रती )
संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई ( वीस प्रती )
आयुक्त,औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मुंबई (वीस प्रती)
व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या., मुंबई ( वीस प्रती )
सर्व विभागीय आयुक्त
जिल्हाधिकारी, ठाणे / नाशिक / पुणे / नागपूर / अमरावती / औरंगाबाद / नांदेड / सातारा / कोल्हापूर / अहमदनगर / जळगाव / मुंबई
सर्व जिल्हाधिकारी
विभागीय उद्योग सहसंचालक, नाशिक / पुणे / अमरावती / औरंगाबाद / मुंबई
अधिक्षकीय उद्योग अधिकारी,नांदेड उपविभाग,नांदेड
महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, ठाणे / नाशिक / पुणे / नागपूर / अमरावती / औरंगाबाद / नांदेड / सातारा / कोल्हापूर / अहमदनगर / जळगाव (तीन प्रती)
उद्योग उप संचालक, जिल्हा उद्योग केंद्र, ठाणे / पुणे / औरंगाबाद / नागपूर / मुंबई
महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नाशिक / अमरावती / औरंगाबाद / नांदेड / सातारा / कोल्हापूर / अहमदनगर / जळगाव (तीन प्रती)
सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र
प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ / महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ठाणे / नाशिक / पुणे / नागपूर / अमरावती / औरंगाबाद / नांदेड
सहसंचालक, बाष्पके संचालनालय, अहमदनगर / नाशिक / नागपूर / पुणे / कोल्हापूर
उपसंचालक, बाष्पके संचालनालय, सोलापूर
अपर कामगार आयुक्त, कोकण / पुणे / नागपूर / अमरावती
उपकामगार आयुक्त, नाशिक / औरंगाबाद / नांदेड
अपर आयुक्त,औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, पुणे / नागपूर / कोल्हापूर
सहसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, कोकण (ठाणे, वसई, कल्याण) / अकोला / औरंगाबाद / नाशिक / पुणे
उद्योग, उर्जा व कामगार विभागातील सर्व कार्यासने
प्रधान सचिव (उद्योग) यांचे स्वीय सहाय्यक
निमंत्रक, उद्योग मित्र
सर्व जिल्हा सेतू सोसायटीचे अध्यक्ष व सर्व सदस्य
अध्यक्ष, सर्व औद्योगिक लघु उद्योग संघटना
निवड नस्ती.

• • • • • • • • • • •